जावक क्रमांक 5491 /२०२३
शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे
दिनांक २८/०७/२०२३


**प्रति,**

मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त सो.यांचे कार्यालय पुणे शहर
यांना सविनय सादर,

**रिपोर्ट** – व्हि.एस.पानकर, पोलीस उपनिरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे.
यांजकडून विनंती पुर्वक की,

**विषय** - मयत इसम याचे फोटो व माहीती वृत्तपत्रात प्रसिदध होणे बाबत...

शिवाजीनगर पोलीस ठाणे अ.म.र.नं ३५/२०२३ सी.आर.पी.सी कलम १७४ मधील एक पुरुष जातीचे अनोळखी मयत नाव व पत्ता माहित नाही वय अदाजे ५० ते ५५ वर्ष हे पुणे मनपा शिवाजी ब्रिजखाली नदीपत्रात पाण्यामध्ये एक पुरूष जातीचा अनोळखी इसम हा उताण्या स्थितीत मिळुन आलेला आहे.असा कॉल नियत्रण कक्ष पुणे येथुन कॉल शिवाजीनगर मार्शल पो.हवा ३१३३ केंगले व पो.ना.११८५ जाधव यांना प्राप्त झाला असता. शिवाजीनगर चौकीचे अंमलदार श्रेणी पोलीस उप-निरीक्षक भगत यांनी सदर अनोळखी इसमास ॲम्बुलन्स मधुन ससुन हॉस्पिटल येथे उपचाराकरता घेवुन गेले असता त्यांचा एम.एल.सी.नं १८४८७ ने डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांना उपचारापुर्वीस मयत दि.२७/०७/२०२३ रोजी ११.५५ वा.मयत घोषित केले आहे. सदरची मयत बॉडी ही मयतास मरण कशाने आले आहे हे समजून येत नसल्याने ते समजून येणेकामी सदरची बॉडी मा. न्यायवैद्यकीय अधि. सो., ससून हॉस्पी. पुणे यांचेकडे पोस्ट मार्टम होवून मिळणेकामी पाठविली असता एम.एल.पी.एम.नं. ४४१९/२०२३ अन्वये त्याचे पोस्ट मार्टम होवून मयताचे मरणाचे कारण दिले नसून मयतास मरण हे Opinion reserved viscera Preserved FOR CHEMICAL Analysis असे ॲडहॉन्स सर्टीफिकेट प्राप्त झाले आहे. सदर इसमाची माहिती खालील तक्त्यामध्ये फोटोसह भरुन पाठविली आहे.

| अ.नं | अ.म.र.नं | मयत घ.ता.वे.ठि. | मयताचे वर्णन | मयताचा फोटो |
|---|---|---|---|---|
| १ | ३५/२०२३ | दि.२७/०७/२०२३ रोजी सकाळी ११/५५ वा ससून हॉस्पिटल पुणे येथे उपचारापुर्वी | मयताचे अंगात लाल रंगाचा टि शर्ट व निळया रंगाची हाप पॅन्ट घातलेली दिसत असुन,तसेच डोक्याचा अर्धवट टक्कल पडलेला, केस काळे पांढरे, बारीक दाढी मिशा,दोन्ही हात पाय सरळ, उजव्या हाताचे पोटरीवर काहीतरी गोंधल्या सारखे, कोणत्याही मारहाणीची किंवा संशयास्पद खुणा दिसुन येत नाही. |  |

तरी सदर वरील वर्णनाचे मयत इसम याचे नातेवाईकांचा शोध होणे कामी फोटो व माहीती वृत्तपत्रात प्रसिदध होणेस विनंती आहे.

मा.सादर व्हावे

पोलीस उपनिरीक्षक
शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे

मार्फतीने सविनय सादर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुण शहर